**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत घेण्यात येणाऱ्या सिंचन विहीरीची कामे पूर्ण करण्यासाठी विशेष मोहीम.**

**महाराष्ट्र शासन**

शासन परिपत्रक क्रमांक मग्रारो-२०१८/प्र.क्र.४३/मग्रारो-१

नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : ३१ मार्च, २०१८

**वाचा** : १) नियोजन विभाग (रोहयो प्रभाग), शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१३/प्र.क्र.२/रोहयो-१०अ, दिनांक १३ ऑक्टोबर, २०११.

२) नियोजन विभाग (रोहयो प्रभाग), शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१२/प्र.क्र.३०/रोहयो-१, दिनांक १७ डिसेंबर, २०१२.

३) नियोजन विभाग (रोहयो प्रभाग), शासन पत्र क्र. मग्रारो-२०१३/प्र.क्र.०३/रोहयो-१०अ, दिनांक ४ डिसेंबर, २०१३.

४) नियोजन विभाग (रोहयो प्रभाग), शासन पत्र क्र. मग्रारो-२०१४/प्र.क्र.०९/ रोहयो-१, दिनांक ५ फेब्रुवारी, २०१४.

## परिपत्रक

समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजनेअंतर्गत अहिल्यादेवी सिंचन विहिरी कार्यक्रमांतर्गत ४१,६६१ विहिरींची कामे पूर्ण झाली असून ७६,६८९ इतक्या विहिरींची कामे प्रगतीपथावर आहेत. प्रगतीपथावरील विहिरींपैकी २५%, ५०% व ७५% कामे अपूर्ण असलेल्या विहिरींच्या विगतवारीचा तक्ता सोबत जोडण्यात आला आहे. प्रत्येक जिल्हयात घेण्यात आलेल्या विहीरींची जास्तीत जास्त कामे पूर्ण करणेबाबतच्या सूचना व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे (VC) देवून सर्व विहिरींची कामे दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत पूर्ण करुन घेण्याबाबत सूचनाही देण्यात आलेल्या आहेत. तथापि, विहिरीची कामे अपूर्ण असल्याचे व अंमलबजावणी मध्ये अडचणी असल्याबाबत तक्रारी विहीर लाभार्थी व लोकप्रतीनिंधीकडून प्राप्त होत आहेत. विहिरी अपूर्ण असल्याची कारणे शोधून त्यावर तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे. लाभार्थींशी थेट संपर्क साधून त्यांच्या अडचणींचे निराकरण करून योजनेच्या अंमलबजावणीला गती देणे आवश्यक आहे. त्यासाठी शासनाने विशेष मोहीम राबविणेबाबत निर्णय घेतला असून त्यासंदर्भात खालील निर्देश देण्यात येत आहेत.

१. सोबत प्रपत्र १ व २ जोडण्यात आले असून त्यानुसार माहिती संकलित करावी. प्राप्त माहितीचे विश्लेषण करुन उपाययोजना निश्चित करण्यात यावी.

२. प्रगतीपथावरील ७५% पूर्ण विहिरी प्राथम्याने पूर्ण करण्यात याव्यात. तद्नंतर ५०% व २५% अशा क्रमाने विहिरी पूर्ण करण्यास प्राधान्य देण्यात यावे.

३ सदर मोहीम दिनांक **०१ एप्रिल, २०१८** ते दिनांक **३० जून, २०१८** या कालावधीत राबविण्यात यावी.

४. सिंचन विहिर कामाच्या बाबतीत प्रमुख अंमलबाजवणी यंत्रणा ग्राम पंचायत आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीने अंमलबजावणीत सक्रीय सहभाग घेणे अपेक्षीत असून मोहीम कालावधीत ग्राम पंचायतीने सूचीत केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

५. सोबतच्या विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे अपूर्ण कामांची टक्केवारी विचारात घेऊन त्यासाठी आवश्यक असलेले मनुष्यदिन गृहित धरून तदनुसार मजूरांचे नियोजन करावे.

**उदा:-** एका मंजूर करण्यात आलेल्या विहिरीमध्ये रु. १,८०,०००/- अकुशल निधीचा भाग असून त्यापैकी रु. ८०,०००/- चे अकुशल काम यापूर्वी पूर्ण झाले आहेत. उर्वरित रु. १,००,०००/- चे अकुशल काम पूर्ण करण्याकरिता साधारणपणे ५०० मनुष्यदिवसाची आवश्यकता आहे. अशी विहीर पूर्ण करण्याकरिता ५ कुटूंबाने १०० दिवस काम केले तर ती विहीर मुदतीमध्ये पूर्ण होईल. नियोजन करताना अशा विहिरीवर ५ कुटूंबे कामे करतील अशा प्रकारचे नियोजन करावे.

६. मजूरांची मागणी आल्यानंतर अपूर्ण विहिरींची कामे देण्यात यावी, अपूर्ण विहिरींच्या कामांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे. गटविकास अधिकारी यांनी आठवडी प्रगती अहवाल तयार करावा तसेच कमी प्रगती असलेल्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करावी.

७. सदर मोहिम राबविण्याबाबतचे वेळापत्रक सोबत जोडल्याप्रमाणे राहील.

८. उपरोक्त प्रमाणे मोहिम विहित कालावधीत राबवून यामधील सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. या मोहीमेच्या संनियत्राची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.

**(एकनाथ डवले)**
**सचिव (रोहयो) महाराष्ट्र शासन.**

प्रति,

आयुक्त, आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)
सर्व उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी नियोजन विभाग (रोहयो)
सारसंग्रह रोहयो-१/ निवडनस्ती (रोहयो.१)

**(शासन परिपत्रक क्र. मग्रारो-२०१८/प्र.क्र.४३/मग्रारो-१, दिनांक ३१ मार्च, २०१८ सोबतचे सहपत्र)**

# वेळापत्रक

| कालावधी | स्तर/कार्यवाही | संबंधित अधिकारी/ कर्मचारी |
|---|---|---|
| २७ मार्च | सचिव (रोहयो) यांच्यामार्फत व्हिडिओ कॉन्फरन्स घेतण्यात आली. | आयुक्त, नरेगा व सर्व उपायुक्त (रोहयो) |
| २ एप्रिल ते ५ एप्रिल | प्रपत्र १ व २ मधील माहिती तयार करणे. | सर्व उपायुक्त (रोहयो), सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत/नरेगा) |
| २ एप्रिल ते ५ एप्रिल | विभागीय आयुक्त यांनी व्हिडिओ कॉन्फरन्स (VC) घेणे | सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत/ नरेगा), उपायुक्त (रोहयो), गटविकास अधिकारी व जिल्हास्तरावरील रोहयोची सर्व अधिकारी यांनी कार्यालयात व्हिडिओ कॉन्फरन्स (VC) करिता उपस्थित रहावे. |
| ६ एप्रिल व ७ एप्रिल | मुख्य कार्यकारी आधिकारी यांनी यंत्रणांची जिल्हा स्तरावर बैठक घेणे. | उपजिल्हाधिकारी (रोहयो) व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत/ नरेगा), कार्यकारी अभियंता (जिल्हा परिषद), गटविकास अधिकारी (नरेगा), गटविकास अधिकारी, नायब तहसिलदार (रोहयो) यांनी उपस्थित रहावे. |
| ७ एप्रिल व ८ एप्रिल | तालुकास्तरीय बैठक | तहसिलदार, गटविकास अधिकारी, नायब तहसिलदार, अतिरिक्त गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, शाखा अभियंता, कृषी अधिकारी, संबंधित पॅनल तांत्रिक अधिकारी, सहायक कार्यक्रम अधिकारी, ग्रामरोजगार सेवक, ग्रामसेवक इत्यादि यांनी उपस्थित रहावे. |
| ९ एप्रिल | ग्रामपंचायत स्तरावरील बैठक व माहिती संकलन | ग्रामसेवक, सरपंच व तालुकास्तरीय पालक अधिकारी (विस्तार अधिकारी, शाखा अभियंता, कंत्राटी पॅनल तांत्रिक अधिकारी, सहायक कार्यक्रम अधिकारी), ग्रामरोजगार सेवक व सर्व लाभार्थी यांनी उपस्थित रहावे. |
| | उर्वरित अकुशल कामाच्या प्रमाणानुसार मजूर कुटूंब संख्या निश्चित करुन त्यांना विहीर निहाय काम देणे. तसेच क्रेन, ब्लास्टींग मशीन इत्यादीचे नियोजन करणे. | |
| १० एप्रिल ते ३० जून | १) विहिरींची प्रत्यक्षात कामे करून घेणे, अकुशल व कुशल कामांच्या मोजमापाच्या नोंदी पूर्ण करणे तसेच FTO तयार करून नरेगा आयुक्तांकडे माहिती पाठविणे | गटविकास अधिकारी |
| | २) सर्व FTO वर कार्यवाहीस्तव लाभार्थ्यांना निधी मिळण्याची खात्री करणे | |
| | ३) तालुका स्तरावर प्राप्त कुशल निधी लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करणे | सर्व गटविकास अधिकारी व तालुका स्तरावरील सर्व प्रमुख नरेगाचे अधिकारी |
| प्रत्येक आठवड्याला | १) सर्व माहिती जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर एकत्रित करून प्रपत्र १ व २ ची माहिती नरेगा आयुक्त यांना पाठविणे | उपायुक्त (रोहयो), उपमुख्य कार्यकारी अधिकारी |
| | २) नरेगा आयुक्तालयाकडून एकत्रित माहिती (मोहिम कालावधीतील पूर्ण विहिरी व खर्चाची) शासनास सादर करणे | आयुक्त नरेगा |

## प्रपत्र-1

## नरेगा विहीरीबाबतची माहिती

| अनु क्र. | जिल्हा | नरेगा Soft प्रमाणे एकुण प्रगतीत असलेल्या विहीरी | 3 वर्षापेक्षा जास्त कालावधी होवुनही शुन्य खर्च असलेल्या विहीरी | 2 वर्षापेक्षा जास्त कालावधी होवुनही शुन्य खर्च असलेल्या विहीरी | 1 वर्षापेक्षा जास्त कालावधी होवुनही शुन्य खर्च असलेल्या विहीरी | 2017-18 मध्ये प्रगतीत असलेल्या विहीरी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |

## प्रपत्र -2

## विहिरी अपूर्ण असण्याची कारणे व विहिरींची संख्या याबाबत माहिती

जिल्हा:-

| अनु क्र. | तालूका | निधी अपुरा प्राप्त आहे | लाभार्थी काम सुरु करण्यास उत्सुक नाही | इनवेल बोर न झाल्यामुळे | विहिरींसाठी Advance दिलेला आहे मात्र Advance चे समायोजन कसे करावे याबाबत अडचण असल्यामुळे | वाद / F.I.R / तक्रार या कारणांसाठी बंद असलेली कामे | नगर पंचायत तथा नागरी क्षेत्रात समाविष्ट गावातील अपूर्ण विहीरी. | 2012 आधी मंजुर झालेल्या तदनंतर निधीमध्ये वाढ झाल्यामुळे विहिरींची कामे अपूर्ण ठेवण्यात आलेल्या विहीरी. | डबल वर्क कोड असलेल्या विहीरी | ब्लॉस्टींग परवानगी तथा ब्लॉस्टींग परवानगी युनीट अप्राप्त असल्यामुळे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |

**Unskilled and Skilled Amount required for Completing Irrigation wells (Amount in Lakh)**

| SN | District | Less than 25% | | | | Between 25 to 50% | | | | Between 50 to 75% | | | | Greater than 75 % | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | No of Ongoing Wells | Pending Unskilled Expd | Pending Material Expd | Pending Total Expd | No of Ongoing Wells | Pending Unskilled Expd | Pending Material Expd | Pending Total Expd | No of Ongoing Wells | Pending Unskilled Expd | Pending Material Expd | Pending Total Expd | No of Ongoing Wells | Pending Unskilled Expd | Pending Material Expd | Pending Total Expd |
| 1 | AHMEDNAGAR | 219 | 273.7 | 216.5 | 490.2 | 303 | 197.1 | 298.7 | 495.8 | 376 | 111.4 | 231.6 | 343.1 | 318 | 38.5 | 86.9 | 125.4 |
| 2 | AKOLA | 592 | 837.0 | 636.8 | 1473.8 | 361 | 258.9 | 323.6 | 582.4 | 364 | 154.6 | 211.9 | 366.5 | 194 | 51.5 | 39.7 | 91.2 |
| 3 | AMRAVATI | 3330 | 2566.4 | 3370.2 | 5936.5 | 1502 | 725.2 | 1242.4 | 1967.6 | 1391 | 615.9 | 533.4 | 1149.4 | 1215 | 186.4 | 130.8 | 317.2 |
| 4 | AURANGABAD | 1485 | 1559.6 | 2197.5 | 3757.1 | 900 | 319.9 | 1103.4 | 1423.3 | 651 | 133.6 | 522.2 | 655.8 | 849 | 80.2 | 112.9 | 193.1 |
| 5 | BEED | 2556 | 3164.2 | 2860.9 | 6025.1 | 1980 | 1050.8 | 1917.7 | 2968.4 | 1976 | 376.7 | 1496.8 | 1873.5 | 1663 | 146.8 | 267.0 | 413.8 |
| 6 | BHANDARA | 222 | 148.5 | 384.3 | 532.8 | 365 | 206.6 | 425.3 | 631.9 | 449 | 187.4 | 302.2 | 489.6 | 299 | 43.8 | 85.8 | 129.6 |
| 7 | BULDHANA | 538 | 726.7 | 658.7 | 1385.4 | 399 | 289.9 | 419.4 | 709.3 | 509 | 156.7 | 439.3 | 596.0 | 353 | 44.4 | 68.9 | 113.3 |
| 8 | CHANDRAPUR | 206 | 145.8 | 396.4 | 542.3 | 225 | 83.2 | 343.3 | 426.5 | 155 | 40.8 | 129.1 | 169.9 | 197 | 28.1 | 48.5 | 76.5 |
| 9 | DHULE | 1844 | 2391.3 | 2407.3 | 4798.6 | 1334 | 664.0 | 1750.7 | 2414.6 | 1586 | 114.2 | 1796.1 | 1910.3 | 424 | 24.9 | 89.6 | 114.5 |
| 10 | GADCHIROLI | 128 | 97.7 | 208.7 | 306.4 | 160 | 62.0 | 208.9 | 270.9 | 281 | 81.3 | 207.9 | 289.2 | 510 | 48.0 | 161.7 | 209.7 |
| 11 | GONDIA | 114 | 76.4 | 199.9 | 276.3 | 157 | 71.9 | 204.0 | 275.9 | 161 | 42.1 | 133.3 | 175.4 | 115 | 8.3 | 49.2 | 57.5 |
| 12 | HINGOLI | 677 | 965.1 | 771.6 | 1736.6 | 205 | 130.2 | 215.4 | 345.5 | 93 | 31.5 | 58.7 | 90.2 | 73 | 8.4 | 11.6 | 20.0 |
| 13 | JALGAON | 955 | 1375.3 | 1171.6 | 2546.9 | 774 | 505.2 | 912.0 | 1417.2 | 589 | 159.7 | 560.5 | 720.1 | 482 | 76.6 | 98.5 | 175.0 |
| 14 | JALNA | 1222 | 1552.5 | 1261.3 | 2813.8 | 819 | 593.6 | 581.2 | 1174.8 | 849 | 339.9 | 429.5 | 769.4 | 592 | 121.8 | 103.8 | 225.6 |
| 15 | KOLHAPUR | 35 | 44.9 | 48.4 | 93.4 | 27 | 17.3 | 31.9 | 49.2 | 12 | 3.2 | 5.8 | 8.9 | 4 | 0.4 | 0.9 | 1.3 |
| 16 | LATUR | 559 | 847.5 | 617.2 | 1464.7 | 721 | 549.9 | 786.0 | 1335.9 | 1541 | 196.8 | 1583.3 | 1780.1 | 571 | 75.1 | 35.8 | 110.9 |
| 17 | NAGPUR | 565 | 749.7 | 711.3 | 1461.0 | 533 | 448.3 | 528.9 | 977.2 | 736 | 411.6 | 389.8 | 801.4 | 574 | 103.1 | 123.7 | 226.9 |
| 18 | NANDED | 1292 | 1709.3 | 1437.5 | 3146.8 | 1172 | 710.3 | 1109.9 | 1820.3 | 816 | 223.9 | 606.6 | 830.5 | 385 | 62.1 | 92.6 | 154.7 |
| 19 | NANDURBAR | 835 | 1327.4 | 895.1 | 2222.5 | 638 | 524.0 | 704.3 | 1228.3 | 505 | 138.4 | 465.7 | 604.1 | 122 | 20.7 | 31.4 | 52.0 |
| 20 | NASHIK | 640 | 721.8 | 789.7 | 1511.4 | 513 | 240.0 | 619.6 | 859.5 | 399 | 44.5 | 397.8 | 442.3 | 190 | 18.2 | 33.7 | 51.9 |
| 21 | OSMANABAD | 420 | 490.8 | 521.2 | 1012.0 | 289 | 120.2 | 377.7 | 497.9 | 293 | 23.8 | 290.1 | 313.9 | 231 | 15.0 | 45.3 | 60.3 |
| 22 | PALGHAR | 532 | 400.7 | 584.1 | 984.8 | 327 | 159.3 | 297.7 | 457.0 | 278 | 123.0 | 114.3 | 237.2 | 334 | 81.4 | 48.6 | 130.0 |
| 23 | PARBHANI | 1401 | 1723.8 | 1986.4 | 3710.2 | 1126 | 506.2 | 1495.6 | 2001.8 | 1134 | 143.9 | 1342.3 | 1486.2 | 1218 | 209.1 | 72.0 | 281.1 |
| 24 | PUNE | 143 | 183.1 | 187.0 | 370.1 | 222 | 127.2 | 252.7 | 379.9 | 298 | 81.1 | 251.5 | 332.7 | 236 | 19.1 | 68.7 | 87.8 |
| 25 | RAIGAD | 7 | 9.8 | 7.8 | 17.6 | 4 | 2.4 | 3.8 | 6.2 | 8 | 0.9 | 8.0 | 9.0 | 1 | 0.0 | 0.0 | 0.0 |
| 26 | RATNAGIRI | 46 | 46.6 | 73.1 | 119.6 | 15 | 7.4 | 23.1 | 30.5 | 5 | 1.9 | 2.5 | 4.4 | 6 | 1.7 | 0.6 | 2.3 |
| 27 | SANGLI | 264 | 343.1 | 337.0 | 680.0 | 306 | 166.0 | 394.0 | 560.0 | 392 | 57.5 | 407.0 | 464.5 | 101 | 12.3 | 26.5 | 38.7 |
| 28 | SATARA | 158 | 216.9 | 187.6 | 404.5 | 185 | 116.0 | 217.2 | 333.3 | 359 | 28.4 | 398.1 | 426.5 | 92 | 3.1 | 17.9 | 20.9 |
| 29 | SINDHUDURG | 170 | 218.8 | 218.9 | 437.7 | 182 | 109.4 | 226.5 | 336.0 | 103 | 22.4 | 92.2 | 114.5 | 113 | 9.5 | 20.1 | 29.6 |
| 30 | THANE | 262 | 272.3 | 425.8 | 698.1 | 83 | 33.5 | 126.4 | 159.9 | 28 | 7.2 | 24.9 | 32.1 | 11 | 0.7 | 5.0 | 5.8 |
| 31 | WARDHA | 560 | 434.1 | 680.8 | 1114.8 | 353 | 161.6 | 363.5 | 525.1 | 574 | 194.4 | 259.2 | 453.6 | 483 | 54.9 | 72.6 | 127.6 |
| 32 | WASHIM | 1542 | 2335.9 | 1735.3 | 4071.2 | 873 | 662.7 | 908.1 | 1570.8 | 580 | 189.1 | 442.6 | 631.6 | 463 | 89.5 | 61.1 | 150.6 |
| 33 | YAVATMAL | 1686 | 2096.4 | 1805.2 | 3901.6 | 1668 | 1021.8 | 1652.7 | 2674.5 | 1251 | 379.3 | 894.6 | 1273.9 | 1275 | 210.0 | 215.9 | 425.9 |
| **Total** | | **25205** | **30052.8** | **29991.0** | **60043.8** | **18721** | **10841.9** | **20065.5** | **30907.4** | **18742** | **4817.1** | **15028.7** | **19845.8** | **13694** | **1893.3** | **2327.3** | **4220.6** |